# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०६ प्रस्ताव क्रमांक : २५ दिनांक :- ०१/०९/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समिती अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ (सोळा) सदस्यांची प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण/२०१०/ प्र.क्र.८५/ नवि-३२ मंत्रालय मुंबई दिनांक ०६ जुलै २०१०.

२) मा.श्री.अविनाश हरीभाउ घुले,सभापती, स्थायी समिती,मा.श्री.शाम किसन नळकांडे, मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे, मा.श्री.समद वहाब खान, सदस्य स्थायी समिती यांचे दिनांक १७/०८/२०२१ रोजीचे पत्र.

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभा सूचना क्रमांक ५ प्रस्ताव क्रमांक २४ दिनांक २३-०८-२०२१ अन्वये महिला व बालकल्याण समितीचे विसर्जन करण्यांत आलेले आहे. त्यांचे जागी महिला व बालकल्याण समितीमध्ये नवीन १६ सदस्यांची नेमणूक करावयाची आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस विषेश समित्या नेमण्याची तरतुद आहे.

१) कलम ३० (१) नुसार महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून महिला व बालकल्याण समितीसह विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. व कलम (१-अ) महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंच्याहत्तर टक्के सदस्य हे, महिला पालिका सदस्यांमधील असतीलः

२) महानगरपालिकेस, तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणा-या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देवून पारित केलेल्या विशिष्ट ठरावाव्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवले पाहिजेत व ते अशा समितीच्या शिफारशींसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजेत असा निदेश देता येईल, तसेच महानगरपालिकेस, तशाच ठरावाव्दारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

३) प्रत्येक विशेष समितीने आपल्या सदस्यांपैकी दोन सदस्यांची सभापती व उपसभापती म्हणून नेमणूक केली पाहिजे : परंतु कोणत्याही पालिका सदस्यास एकाच वेळी एकापेक्षा अधिक विशेष समित्यांचा सभापती होता येणार नाही.

(परंतु आणखी असे की, महिला व बालकल्याण समितीवरील अध्यक्ष (सभापती) व उपाध्यक्ष (उपसभापती) या तिच्या महिला पालिका सदस्यांमधील असतील.)

४) सभापती व त्याच्या अनुपस्थितीत उपसभापती आणि या दोघांच्या अनुपस्थितीत, विशेष समितीचे जे सदस्य सभेत उपस्थित असतील त्यांनी निवडलेला अन्य सदस्य सभेच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम चालवील.

५) विशेष समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजार किंवा अशा समितीने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य कारणामुळे लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत अशा समितीच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील किंवा कोणत्याही कारणामुळे - मग ते अशा समितीने मान्य केलेले असो वा नसो- लागोपाठ चार महिन्यांच्या मुदतीत अशा समितीच्या सभांना स्वतःअनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तो अशा समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल व त्यानंतर त्याची जागा रिकामी होईल.

६) प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन असेल :

परंतु पोट-कलम (२) अन्वये आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये विशेष समित्यांकडे सोपवताना महानगरपालिकेने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निदेश दिला असेल तर, अशा समितीच्या कामकाजापैकी असे अधिकार व कर्तव्ये या संबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन राहणार नाही. मात्र अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यांपैकी निदान दोन तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजे :

आणखी असे की, कोणत्याही विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार उपाययोजना करण्यास विलंब झाल्यास त्यामुळे अत्यंत गैरसोय होईल असे वाटत असेल तर, तिला आपले कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाणे आवश्यक असेल अशा बाबतीत, अशा कायम करण्याची वाट न पाहता अशी उपाययोजना करण्यात यावी, असा निदेश, एकुण सदस्यांपैकी निम्म्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाव्दारे देता येईल, परंतु महानगरपालिकेने अशा समितीचे कामकाज नंतर कायम केले नाही तर, महानगरपालिकेचे आदेश अंमलात आणण्यासाठी त्यावेळी व्यवहार्य असतील अशा उपाययोजना विलंब न लावता करण्यात आल्या पाहिजेत.

७) महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल.

८) विशेष समित्यांची रचना व अशा समित्यांच्या सभांत कामकाज चालवणे, कामकाजाच्या टिप्पण्या ठेवणे व प्रतिवृत्त सादर करणे व अशा समित्यांपुढील अन्य बाबी यांचे नियमन नियमांव्दारे करता येईल.

तसेच या समितीवर प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये पुढील तरतुद आहे. "

**कलम ३१-अ (१)** कोणत्याही समितीवरील पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यांत आली असेल त्याव्यतिरीक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तद्नंतर केलेल्या नियमांत किंवा उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोटकलम (२) च्या तरतुदीं अनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करुन करण्यात येईल मग ही नियुक्ती नियमीत पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो :-

(क) स्थायी समिती :

(ख) परिवहन समिती

(ग) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती

(घ) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती

**(२)** समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांचेशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

(परंतु मान्यतप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट याचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकुण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेउन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील.अशा रितीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वांत मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यांत येतील.)

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र घेवून आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकीपुर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

**(३)** अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल."

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील वरील तरतुदींप्रमाणे महिला व बाल कल्याण समितीवर १६ सदस्यांच्या नेमणुका करतांना संदर्भीय परिपत्रकातील कार्यपध्दतीनुसार करावयाच्या आहेत. ही कार्यपध्दती पुढील प्रमाणे आहे. **:-**

(१) विरोधी पक्ष नेत्यामार्फत किंवा गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर अथवा इतर समित्यांवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नावे पाठविताना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौरांकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापूर्वी सदर नावे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयातच आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

(२) सदर बंद लखोटे सभेच्या वेळेस ते मूळच्याच अवस्थेत असून, ते पूर्वी उघडलेले नाहीत, याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविण्यात यावेत.

(३) सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते महापौरांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडावेत व प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात यावीत.

(४) सभेत वाचण्यात आलेल्या नामनिर्देशित पालिका सदस्यांच्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती, त्यांचे काही आक्षेप नसल्यास, नामनिर्देशनाने निवडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(५) याबाबत संबंधीतांचे आक्षेप असल्यास आयुक्तांकडे दिलेला दुसरा लखोटा उघडण्यात यावा व त्यातील आणि महापौरांकडील लखोटयातील नावे समान असल्याची खात्री करावी व तशी खात्री झाल्यास निवडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. मात्र, नावे समान नसल्यास पूर्वी दिलेली लखोटयामधील नावे रद्द समजून नव्याने नामनिर्देशित करावयाची पालिका सदस्यांची नावे

लेखी विरोधी पक्ष नेत्याकडून अथवा गट नेत्याकडून त्यांच्या स्वाक्षरीनिशी घेण्यात यावीत व त्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(६) या संपूर्ण कामकाजाचे चित्रीकरण करण्यात यावे.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १ दिनांक २८/०१/२००५ नुसार महिला व बाल कल्याण समितीची सदस्य संख्या १६ निश्चीत करण्यात आली आहे. व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१ अ) अन्वये समिती सदस्यांपैकी किमान ७५ % सदस्य हे महिला पालिका सदस्यामधील असतील असे असले तरी उपरोक्त सभेत समितीवर १०० % महिला सदस्य असाव्यात असे तत्कालीन सदस्यांनी सुचविलेले होते व त्याप्रमाणे पिठासीन अधिकारी यांनी सर्व सदस्याच्या एकमताने महिला बाल कल्याण समितीसाठी १६ सदस्य संख्या निश्चीत केली आहे. त्याप्रमाणे आजही विचार करावयाचा झाल्यास उपरोक्त आदेशाप्रमाणे मा.महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ सदस्यांची नियुक्ती करावयाची झाल्यास पक्षनिहाय सदस्य नियुक्ती बाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

**एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६७ ÷ १६ = ४.१८**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २३ | ÷ ४.१८ | ५.५० | ५ | - | ५ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ | ÷ ४.१८ | ४.५४ | ४ | १ | ५ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १५ | ÷ ४.१८ | ३.५८ | ३ | १ | ४ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ | ÷ ४.१८ | १.१९ | १ | -- | १ |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ | ÷ ४.१८ | ०९५ | -- | १ | १ |
| ६ | समाजवादी पार्टी | १ | ÷ ४.१८ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | | १३ | ३ | १६ |

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ (२) पाहता वर नमुद केलेल्या बलाबलानुसार मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नविन सदस्य नामनिर्देशनाव्दारे महिला व बालकल्याण समितीवर नियमानुसार १६ (सोळा) सदस्य नेमणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

सबब आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर अतिरिक्त आयुक्त यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** गटनेत्यांनी पत्र आणून द्यावेत.

गटनेते मा.महापौर, मा.सौ.सुप्रिया जाधव, मा.श्रीमती.मालन ढोणे, मा.श्री.संपत बारस्कर, मा.श्री.शेख मुदस्सर सर्व गटनेत्यांनी पत्र पिठासीन अधिकारी यांचेकडेस आणुन दिले.

**मा.महापौर साहेब :-** गटनेत्यांनी दिलेल्या पत्रातील सदस्यांची नांवांचे वाचन केले.

**शिवसेनेच्या गटनेत्या तथा महापौर मा.सौ.रोहिणी शेंडगे :-** मा.सौ.कमल दत्तात्रय सप्रे, मा.सौ.पुष्पा अनिल बोरुडे, मा.सौ.सुरेखा संभाजी कदम, मा.सौ.सुवर्णा संजय गेनप्पा, मा.श्रीमती.शांताबाई दामोधर शिंदे

**भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या मा.श्रीमती.मालन ढोणे :-** मा.सौ.ताठे वंदना विलास, मा.सौ.चितळे सोनाली अजय, मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे, मा.श्रीमती.पल्लवी दत्तात्रय जाधव

**कॉग्रेस आघाडीच्या गटनेत्या मा.सौ.सुप्रिया जाधव :-** मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव

**नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडीचे गटनेते मा.श्री.संपत बारस्कर :-** मा.सौ.मीना संजय चोपडा, मा.श्रीमती.शोभा सुधाकर बोरकर, मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर, मा.श्रीमती.कुरेशी परवीन आबीद, मा.सौ.मीना शिवाजी चव्हाण

**बहुजन समाज पार्टीचे गटनेते मा.श्री.शेख मुदस्सर :-** मा.सौ.अनिता जसपालसिंग पंजाबी

वरिल प्रमाणे महिला व बालकल्याण समितीच्या १६ सदस्यांची नांवे वाचून त्यांची नियुक्ती जाहीर करण्यांत आली.

---*---

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, सर्व पक्षाच्या मा.गटनेत्यांनी सुचविलेल्या १६ मा.महिला व बाल कल्याण समिती सदस्यांचे नावास मान्यता देण्यांत येत आहे.

प्राप्त नामनिर्देशनापैकी खालील प्रमाणे सदस्य, **मा.महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदी** विधीग्राहयरित्या नामनिर्देशित झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | सौ.कमल दत्तात्रय सप्रे | शिवसेना |
| २ | सौ.पुष्पा अनिल बोरुडे | शिवसेना |
| ३ | सौ.सुरेखा संभाजी कदम | शिवसेना |
| ४ | सौ.सुवर्णा संजय गेनप्पा | शिवसेना |
| ५ | श्रीमती.शांताबाई दामोदर शिंदे | शिवसेना |
| ६ | सौ.मीना संजय चोपडा | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्रीमती.शोभा सुधाकर बोरकर | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ८ | सौ.मीना शिवाजी चव्हाण | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ९ | दिपाली नितीन बारस्कर | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| १० | कुरेशी परवीन आबीद | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ११ | सौ.ताठे वंदना विलास | भारतीय जनता पार्टी |
| १२ | सौ.चितळे सोनाली अजय | भारतीय जनता पार्टी |
| १३ | सौ.आशा शिवाजीराव कराळे | भारतीय जनता पार्टी |
| १४ | श्रीमती.पल्लवी दत्तात्रय जाधव | भारतीय जनता पार्टी |
| १५ | सौ.सुप्रिया धनंजय जाधव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १६ | पंजाबी अनिता जसपालसिंग | बहुजन समाज पार्टी |

सुचक : मा.सौ.सुवर्णा संजय गेनप्पा,

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.　　　　　जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.-　　　　　दिनांक : २५/०८/२०२१

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
बुधवार दिनांक ०१/०९/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे होणा-या विशेष सर्वसाधारण सभे बाबत...

प्रति,

१) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.आनंदा झारखंडे, आस्थापना विभाग,
३) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय,
४) श्री. बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
५) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता कार्यालय
६) श्री.प्रदीप निलाखे, महिला व बालकल्याण समिती कार्यालय,
७) श्री.राज चोटीले, सिक्युरिटी गार्ड

अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०१/०९/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**कार्यालयीन आदेश.** जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : २५/०८/२०२१

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
बुधवार दिनांक ०१/०९/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या मा.विशेष सर्वसाधारण सुचना क्रमांक ०६ मध्ये आपले नावासमोरील नगरसेवकांना व्हिडीओ कॉन्फरन्सींगचे मार्गदर्शन करणे बाबत...

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०६ **बुधवार दिनांक ०१-०९-२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी खालील प्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या सन्माननीय सदस्यांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करावे.

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ११ - ब | घुले अविनाश हरिभाऊ<br>**सभा□ती, स्थायी समिती** | 9225322062 | श्री.विष्णु देशमुख |
| २ | ११ - ड | शेख नजीर अहमद अ.रज्जाक | 9272225862 | |
| ३ | १२ - अ | बाळासाहेब मारुती बोराटे | 9422222079 | |
| ४ | १२ - ड | कावरे दत्तात्रय हरीभाऊ | 9881777760 | |
| ५ | १३ - अ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | 9270443333 | |
| ६ | १३ - ड | लोंढे सुभाष सो□ानराव | 9921799992 | |
| ७ | १४ - अ | भागानगरे प्रकाश बाबुराव | 9422230181 | |
| ८ | १४ - ड | भोसले गणेश □ुंडलिक<br>**उ□महा□ौर** | 9422221596 | |
| ९ | १५ - अ | गायकवाड □रसराम बाळू | 9860536395 | |
| १० | १५ - ड | शिंदे अनिल माधवराव | 9422223268 | |
| | | | | |
| ११ | ०४ – क | योगीराज शशिकांत गाडे | 9689896982 | श्री.किरण उजागरे |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १२ | ०५ – अ | दुलम मनोज लक्ष्मण | 9225700007 | |
| १३ | ०५ – ड | गंधे (भैय्या) महेंद्र मोहनिराज | 9422220460 | |
| १४ | ०६ – ड | बारस्कर रविंद्र रावसाहेब **सभागृहनेता** | 9422221333 | |
| १५ | ०७ – ब | बडे अशोक किसन | 9822451468 | |
| १६ | ०७ – ड | वाकळे कुमार बबन | 9730015555 | |
| १७ | ०८ – क | शिंदे सचिन चंद्रशेखर | 9422229078 | |
| १८ | ०८ – ड | नळकांडे शाम किसन | 9271907171 | |
| १९ | ०९ – क | छिंदम श्री□ाद शंकर | 9823055555 | |
| २० | १० – अ | उणावणे अक्षय सदानंद | 9130065007 | |
| | | | | |
| २१ | ०६ - ब | वाकळे बाबासाहेब सोन्याबा□ु, | 9422226510 | श्री.किशोर कानडे |
| २२ | १० - ड | शेख मुदस्सर जहांगीर | 8007863232 | |
| २३ | ०४ – ड | शिंदे स्वप्निल रोहिदास | 7774937777 | |
| २४ | ०१ – ड | बारस्कर सं□त विजय | 9890408050 | |
| २५ | ०१ – अ | बोरुडे सागर अर्जुन | 9822115406 | |
| २६ | ०२ – अ | □ाऊलबुधे विनीत नाथ | 9822076968 | |
| २७ | ०२ – ड | त्र्यंबके सुनिल नारायण | 9552690159 | |
| २८ | ०३ – अ | आसिफ सुलतान | 9822828589 | |
| २९ | ०३ – ड | खान समद वहाब | 9860147715 | |
| | | | | |
| ३० | ०९ – ड | सुप्रिया धनंजय जाधव | 9860655555 | श्रीमती. हेमलता साळवे |
| ३१ | १० – ब | जाधव अश्विनी सचीन | 9850100009 | |
| ३२ | १० – क | □ंजाबी अनिता जस□ालसिंग | 9422236460 | |
| ३३ | ११ - अ | □ारगे रु□ाली जोसेफ | | |
| ३४ | ११ - क | कुरेशी □रवीन आबीद | 9665025555 | |
| ३५ | १२ - ब | सुरेखा संभाजी कदम | 9422222003 | |
| ३६ | १२ - क | लोखंडे मंगल सुनिल | 9423561112 | |
| ३७ | १३ - ब | चितळे सोनाली अजय | 9881451331 | |
| ३८ | १४ - ब | जगता□ शितल संग्राम | | |
| ३९ | १४ - क | चो□डा मीना संजय | 9822025757 | |
| | | | | |
| ४० | ०४ – ब | बोरकर शोभा सुधाकर | 9225522255 | श्रीमती.मेघना निकम |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
| --- | --- | --- | --- | --- |
| ४१ | ०५ – ब | शिंदे सोनाबाई तायगा | 7350333303 | |
| ४२ | ०५ – क | आशा शिवाजीराव कराळे | 9422221015 | |
| ४३ | ०६ – अ | जाधव □ल्लवी दत्तात्रय | 9604390180 | |
| ४४ | ०६ – क | ताठे वंदना विलास | 9527525888 | |
| ४५ | ०७ – अ | भाकरे रीता शैलेश | 9860755573 | |
| ४६ | ०७ – क | सप्रे कमल दत्तात्रय | 9822051375 | |
| ४७ | ०८ – अ | शेंडगे रोहिणी संजय<br>**महा□ौर** | 9822788388 | |
| ४८ | ०८ – ब | बोरुडे □ुष्□ा अनिल | 9422227473 | |
| ४९ | ०९ – अ | चव्हाण शीला दी□ | 9422221555 | |
| | | | | |
| ५० | ०९ - ब | ढोणे मालन सुरेश | ९९२३३१४२२४ | सौ.जोशी स्मिता |
| ५१ | १७ – क | शेळके लताबाई बलभिम<br>**सभा□ती,महिला व बा.समिती** | 9657979797 | |
| ५२ | १३ – क | गेनाप्□ा सुवर्णा संजय<br>**उ□सभा□ती, मबाकस** | 9420689999 | |
| ५३ | ०१ – ब | सौ.मिना शिवाजी चव्हाण | 8788206185 | |
| ५४ | ०१ – क | बारस्कर दि□ाली नितीन | 9822415757<br>8087099198 | |
| ५५ | ०२ – ब | वारे रु□ाली निखील | 9850000852 | |
| ५६ | ०२ – क | □वार संध्या बाळासाहेब | 9561252700<br>8888757636 | |
| ५७ | ०३ – ब | खान मीनाज जाफर | 9021112312 | |
| ५८ | ०३ – क | शेख रिजवाना फारूक | 9881870245 | |
| ५९ | ०४ – अ | सौ.ज्योती अमोल गाडे(कर्डीले) | 8975872525 | |
| | | | | |
| ६० | १५ - ब | जाधव सुवर्णा दत्ता | 9271881256<br>9404615151 | श्री.उपलंची |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| ६१ | १५ - क | खैरे विद्या दि□क | 9881742471 | |
| ६२ | १६ - अ | शिंदे शांताबाई दामोदर | 9890537625 | |
| ६३ | १६ - ब | कोतकर सुनिता संजय | 8888026575 | |
| ६४ | १६ - क | □ठारे विजय मोहनराव | 9623240303 | |
| ६५ | १६ - ड | येवले ज्ञानेश्वर ऊर्फ अमोल शिवाजी | 9881778181 | |
| ६६ | १७ - अ | कांबळे राहुल दादु | 9922708803 | |
| ६७ | १७ - ब | ननावरे गौरी गणेश | 9422319181 | |
| ६८ | १७ - ड | कोतकर मनोज शंकर | 9890449126 | |
| | | | | |
| ६९ | स्विकृत सदस्य | आढाव मदन सं□त | ९२७२८१७१११ | श्री.सोनु चौधरी |
| ७० | स्विकृत सदस्य | शेळके संग्राम बबनराव | ९६८४१११११११ | |
| ७१ | स्विकृत सदस्य | आंधळे रामदास नानाभाउ | ९८२३०३६१६१ | |
| ७२ | स्विकृत सदस्य | शेटीया वि□ुल मुलचंद | ९८२२०६९८११ | |
| ७३ | स्विकृत सदस्य | कातोरे राजु आसाराम | ९८९०९०२२९१ | |

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : २५/०८/२०२१

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०६ **बुधवार दिनांक ०१-०९-२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त (सा),
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ५) | श्रीमती.मेघना निकम, नगरसचिव विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

---*---

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०६, बुधवार दि. ०१/०९/२०२१ रोजीचा विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.बाळासाहेब भोर | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर, | |
| ३ | श्री.आनंदा झारखंडे | |
| ४ | श्री.बाबासाहेब कोतकर | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

नगरसचिव विभाग.-                                                                 दिनांक : २१/०६/२०२१

विषय : शुक्रवार दिनांक - २५ / ०६ /२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०२ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक २ शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे व्हीडीओ कॉन्फरन्सींग व्दारे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.४७०/- (अक्षरी रक्कम रुपये चारशे सत्तर फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या * **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.